# पाक्षिक 'जागतिक नवे पर्व' मधील वाङ्:मयी भाषा शैली

**डॉ.रेखा काशिनाथ पसाले** विभाग प्रमुख आणि सहय्योगी प्राध्यापक, मराठी विभाग आर्ट्स अंड कॉमर्स कॉलेज, कासेगाव

---

**प्रस्तावना**

वाङ्:मयनिर्मितीची प्रक्रिया ही गूढ आणि अज्ञात असते. या वाङ्:मयनिर्मितीतून आपल्याला समाजाचे दर्शन घडते. कथा, कादंबरी, कविता, नाटय, चरित्र, आत्मचरित्र, ललित, लेख, पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन, लोकसाहित्य, संतसाहित्य इत्यादी अनेक साहित्य प्रकारातून लेखक लिहित राहतो. त्या त्या काळातील सामाजिक परिस्थिती साहित्यात उमटू लागते. यामध्ये नियतकालिकाची भूमिका महत्वाची आहे. वाङ्:मय अभिरुची वाढण्यामागे नियतकालिकांचे योगदान अतिशय भरीव स्वरूपाचे आहे. समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचा परामर्श घेतल्यास नियतकालिकांच्या कार्याचा प्रत्यय आपणास येत असतो. या संदर्भात 'जागतिक नवे पर्व' ही नियतकालिका समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब अधोरेखित करत असते . या नियतकालिकाचे वाङ्:मयी लेखनाची वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**नियतकालिक :**

एकाच शीर्षकाखाली ठरावीक काळाच्या अंतराने बऱ्याच विषयांचे लेखन ज्यात होते, त्याला नियतकालिक असे म्हणतात. ब. दि. कुलकर्णी यांच्या मते, "नियतकालिक म्हणजे ठरावीक काळाच्या अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङ्:मय त्यात तात्कालिक महत्त्वाचे तपशील असतात व काही चिरस्थायी महत्त्वाचे विषयही आलेले असतात"[१] प्र. न. जोशी म्हणतात, "ठरावीक काळानंतर प्रसिद्ध होणाऱ्या मुद्रित लेखनास नियतकालिक म्हणतात."[२] यावरून आपणास नियतकालिकाचे स्वरूप लक्षात येते.

**'जागतिक नवे पर्व' च्या वाङ्मयी लेखनाचे स्वरूप :**

'जागतिक नवे पर्व' या नियतकालिकात एकविसाव्या शतकामधील बहुजनांसाठी कार्य करणाऱ्या नियतकालिकामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकार केली. या नियतकालिकामध्ये संपादकिय लेख , ग्रंथप परीक्षण, कविता, यांचे लेखन प्रकाशित होत होते. या लेखनाची एक स्वतंत्र अशी भाषाशैली होती. वाक्यरचना, शब्दांची घडण, प्रसंगनिर्मिती, काव्यभाषा, म्हणी-वाकृप्रचार ह्यांचावापर अशा अनुषंगाने आपल्याला ही भाषाशैली अभ्यासता येते. भाषा हे विचार आणि भावना शब्दांच्या द्वारे व्यक्त करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. साहित्यामध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण साहित्याचे माध्यम हे भाषाच आहे. भाषेच्या माध्यमामधून लेखक आपल्या भावभावनांना अभिव्यक्त करीत असतो. साहित्यकृतीमध्ये प्रकट होणाऱ्या अनुभवाच्या मागणीनुसार लेखक भाषेचा उपयोग करीत असतो. लेखकाने वापरलेल्या भाषाशैलीवर देश, काळ आणि परिस्थितीचा प्रभाव पडतो. त्याचबरोबर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावही भाषेवर पडत असतो. यशवंत चव्हाण यांच्या भाषेचा प्रभाव 'जागतिक नवे पर्व' च्या भाषाशैलीवर पडलेला आहे. निर्भीडता, प्रखरता हे यशवंत चव्हाण ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्तपूर्ण पैलू असल्यामुळे 'जागतिक नवे पर्व' ची भाषाशैली प्रखर आणि टीकात्मक बनलेली दिसते.

'जागतिक नवे पर्व' मधील संपादकीय भाषा साधी, सरळ व सोपी असली तरी ती वेगळ्या धाटणीची आहे. वाचक हा बहुजन समाजामधील आहे. त्यामुळे अनेकदा ते जाणीवपूर्वक मांडणीच्या ओघामध्ये बोलीभाषेमधील ठेवणीमधले अस्सल शब्द वापरताना दिसतात. त्यांच्या शब्दचातुर्यामुळे त्यांच्या भाषेला सौंदर्य प्राप्त होते. उदा. "खोलवर गेलेली मुले", स्वातंत्र्य आणि लोकशाही.नवा दृष्टीकोण मिळाल", भ्रष्टाचाराची गंगोत्री, उपरती की परिस्थती ?, हाच एकमेव मार्ग, कॉग्रेस पुन्हा बलवाना कशी होईल.?, एक उत्साहवर्धक घटना इत्यादी.इत्यादी अनेक ठेवणीमधील शब्द, लोकोक्तींमुळे अस्सल बहजनसमाजासाठीच लिहीत होते, याची साक्ष पटते. शैलीच्या संदर्भामध्येही 'जागतिक नवे पर्व' मधील भाषा ही वेगळ्याच धाटणीची असल्यामुळे ती वाचकाला गुंतवून आणि अभ्यासकांना आवाक करून सोडते. भाषाशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही भाषा विविधतेने नटलेली आहे. तर्काधिष्ठित भाषा, विनोट, उपहास, वर्णनपर, उपरोधपर, माहितीरूप अशी भाषेची विविध रूपे यामध्ये आढळतात.

'जागतिक नवे पर्व'मध्ये काव्याची भाषा ही व्यावहारिक भाषेपेक्षा संरचनेच्या अंगाने वेगळी ठरते. काव्यत्म भाषेची ध्वन्यात्मक, अर्थात्मक अंगे आपल्याला जाणवू शकतात. काही वेळेस एखाद्याला काव्यातील शब्दांच्या पोतापेक्षा त्या शब्दांची संरचना, त्यांची योजनाचअधिक भावू शकते. रसिकास अनुभवास येणारी ही बुद्धिगम्य संरचना निर्माण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे काव्यात्म प्रतिमा हा होय. काव्य हा कल्पनेचा एक विशिष्ट मार्ग आहे. हा खास मार्ग कोणता,

तर प्रतिमांच्या आश्रयाने किंवा प्रतिमांमधूनच विचार करणे, हा होय. साहित्यिक हा अशा प्रतिमांच्या भाषेमधून आपले विचार मांडतो.

'जागतिक नवे पर्व' यांचे लेखन अतिशय सोपे, सुटसुटीत आहे. संस्कृत, इंग्रजी व मराठी भाषांचा गाढा व्यासंग असूनही ते भाषेच्या दृष्टीने क्लिष्ट किंवा जड वाटेल, असे लिहीत नाहीत. ह्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना जसे संपादकीय भान होते, तसेच आपला वाचकवर्ग कोण आहे आणि आपण कोणासाठी लेखणी राबवितो आहोत, ह्याची पक्की जाणही होती. त्याचे लेखन मात्र सामान्य वाचकांशी थेट संवाद साधणारे, सरळ, साधे होते. तसेच स्पष्टता आणि रोखठोकपणा हे 'जागतिक नवे पर्व' च्या भाषाशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. स्पष्ट आणि रोखठोक विषयमांडणीवर अधिक भर दिलेला दिसून येतो. टीका-टिप्पणी करतानादेखील प्रत्येक विषय स्पष्ट करून सांगण्यावर 'जागतिक नवे पर्व' ने भर दिलेला आहे. टीका करताना प्रतिपक्षाची बाजूदेखील स्पष्टपणे मांडून त्यावरील आपली प्रतिक्रिया देणे, हे 'जागतिक नवे पर्व' चे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरते.

'जागतिक नवे पर्व' च्या भाषाशैलीचे स्वरूप पाहताना त्याच्या शीर्षकांची भाषाशैलीदेखील तपासावी लागते. शीर्षक किंवा मथळा हा नियतकालिक क्षेत्रामधील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. नियतकालिकाचा दर्जा हा शीर्षकावरून आणि त्याच्या भाषाशैलीवरून

ओळखला जातो. शीर्षकावरून बातमीची कल्पना येते.

'जागतिक नवे पर्व' ने आवश्यक त्या ठिकाणी परखड भाषाशैलीचा वापर केलेला आहे. आपले मत कोणाच्याही दबावामध्ये न येता निर्भीडपणे व्यक्त करणे ही भूमिका 'जागतिक नवे पर्व' ने स्वीकारलेली होती. कष्टकरी, सामान्य जनतेच्या चळवळ पुढे नेण्यासाठी कार्य करत असताना आवश्यक ठिकाणी परखड भाषेचा वापर करणे स्वाभाविकच म्हणावयास हवे. अशी भाषा वापरून आपले मत स्पष्ट आणि परखडपणे व्यक्त करण्यात आले आहे.

**'जागतिक नवे पर्व' पाक्षिकातील वैचारिक लेखन व मराठी साहित्य**

वैचारिक स्वरूपाच्या लेखनात लेखक हा 'जागतिक नवे पर्व'च्या समाजव्यवस्थेत वैचारिक स्वातंत्र्याच्या माध्यमातून स्वतःचे विचार मांडत असतो. या विचार प्रकटिकरणातून इतरांचे विचार ग्रहण केले जाते किंवा कधी त्या विचारांना सभ्यपणे मतभेद देखील व्यक्त करत असतात. भाषेद्वारे जेव्हा आपण एखाद्या व्यक्ती,वस्तू,स्तिथीविषयी किंवा इतर कुठल्याही विषयांवर विचार प्रकट होते, त्या विचारांमधून आपण आपले ज्ञान,अभिरुची,आपली जीवनधारणा,नैतिक भूमिका, आपले व्यक्तिमत्त्व हे जगातिक नवे पर्व तून प्रकट झाले आहे. या नियतकालिकात एखाद्या विषयांवरील इतरांच्या मतांना मांडत जात त्यातील उणिवा,त्रुटी दर्शवत स्वतःचे विचार, युक्तिवाद कौशल्याने पूरक उदाहरणे,संदर्भ देऊन पटवून देणारे वैचारिक लेखनात आहे. तर्कशुद्ध निष्कर्ष काढून,विषय विवेचन करत साहित्य व कला समीक्षा, वर्तमानपत्रे, ग्रंथ, संशोधन, पाहणी अहवालाचे निष्कर्ष इत्यादी क्षेत्रात वैचारिक लेखन केलेले दिसते. सामान्यतःराजकारण, राजकीय व्यवस्था, धर्म न्याय व्यवस्था, कलामुल्य मापन, अध्यात्म, वर्तमानपत्र, संस्कृती-इतिहास मीमांसा,तत्वज्ञानात्मक असे वैचारिक लेखन जगातिक नवे पर्व च्या लिखाणात दिसते.

'जागतिक नवे पर्व' च्या नियतकालिकेत संपादकांनी लिहलेल्या संपादकीय लेखात राजकीय जागृती, लोकशिक्षण, जाणीव याची प्रेरणा दिसून येते. सद्यस्थितीतील प्रश्न, समस्या,घटना,व्यक्तीच्या कृती अशा विविध जीवनक्षेत्रासंबंधित विषयांवर संपादकीय लेखातून ठराविक शब्दात विचार मांडले आहेत. सामान्य माणसाला जागे करणे व विधायक कृतिसाठी प्रेरित करणे हे लेखाचे उद्दिष्ट दिसते. उदा. संपादकीय लेखणाचे मूळ कार्य हे वर्तमानातील सामाजिक, राजकीय परिस्थितींवर भाष्य केलेले आहे.

नियतकालिकेत विचारांची सुसूत्र, तर्कशुद्ध मांडणी लेखनात केली आहे. जागतिक नवे पर्व मधील लेखन गांभीर्यपूर्वक लिहलेला तसेच समाजाला उपयुक्त असे विचार, दृष्टिकोन मांडलेले आहे. विचार अनुभूती किंवा कल्पनांची,मुद्यांची सुसूत्र बांधणी येथे अभिप्रेत झाली आहे. तसेच एखाद्या विशिष्ट विषयावर समकालीन संदर्भ देत लिहलेला नियतकालिकातील लेख. यात वैचारिक गांभीर्य असून चिंतानफल मांडले आहे. मर्यादित शब्दात सुत्ररूपाने, संक्षेपाने असे लेखन केले आहे.

'जागतिक नवे पर्व' मधील कविता या भावनेला महत्व देणारा साहित्य प्रकारातील आहेत. कवीच्या भावनात्मकतेचे सहज,उत्कट व प्रत्ययकारी संक्रमण वाचकांमध्ये करते. कवीला भावनात्मक अनुभवाची तीव्र, उत्कट अशा अविष्काराची ओढ असते. त्यातूनच तो काव्यशब्द,काव्यभाषा घडवतो.कवितेत भाषिक मोडतोड मोठ्या प्रमाणावर होते, त्यामागे कवीचा सौंदर्यसर्जनाचा हेतू असतो.व्यवहारभाषेची परंपरागत नियमव्यवस्था, संकेतव्यवस्था मोडली गेल्याने वाचक

किंवा श्रोता मूळच्या संकेतव्यवस्थेचे स्मरण ठेवीत कविनिर्मित नव्या व्यवस्थेकडे आकर्षित होतो. भाषेच्या लयींचा, नादगुणांचा, दृश्यागुणांचा,दृश्यात्मकतेचा सूचक वापरही कवी करत असतो. भाषेच्या गद्य साहित्य प्रकारांमध्ये भाषा हे बहुदा माध्यम व साधन म्हणून कार्य करते.परंतु कवितेत भाषा हे भावसंप्रेषणाचे माध्यम बनले असले तरी यामध्ये सामाजिक कविता अधिक असून यामध्ये समाजाच्या सुख-दुःखांचे, व्यथा-वेदनांचे, बऱ्या-वाईट घडामोडी-आंदोलने-चळवळींचे चित्रण करणारी कविता आहेत. यामध्ये समूहजाणिवेला, समूहाच्या व्यथेला, दुःखाला आपल्या अभिव्यक्त केले जाते. नियतकालिकामधील कविता या समाजविषयक असलेली कविता होय. अर्थात समाजातील सर्वच क्षेत्रे सामाजिक कवितेचा विषय होऊ शकतात, असे नाही. उदा. समाजकारण आणि राजकारण ही समाजातीलच क्षेत्रे असूनही ती आपण भिन्न मानत आलो. पण त्याच्यावर परखड पणे कवितेतून मत मांडले आहे. समाजाची सुख-दुःखे, व्यथा-वेदना, प्रश्न-समस्या, घडामोडी-चळवळी-आंदोलने ह्यांना महत्त्वाचे स्थान असते. तसेच कवितेतून कधी वर्णनाच्या, कधी निवेदनाच्या, कधी चित्रणाच्या, तर कधी चिंतनाच्या पातळीवरून व्यक्त केले आहे.

**निष्कर्ष :**

आपले विचार, भावना, कल्पना इत्यादींचे आपण लेखन करतो किंवा आपल्या विचारांना आपण लिपीबद्ध करतो. यालाच आपण लेखन म्हणतो. हे एक भाषिक कौशल्य आहे. लेखनाला व्याकरणीक अशी नियमांची चौकत असते. लेखन करत असतांना किंवा त्या पूर्वी आपण मानसिक चिंतन करीत असतो, ही एक प्रकारची विचार निर्मितीची प्रक्रिया असते. यात आपण आपल्याला पटलेले वा न पटलेलेही विचार व्यक्त करू शकतो. किंवा इतरांचे विचार, मतेही आपण विचार प्रतिपादनात घेऊ शकतो. साहित्य हा खूप व्यापक विषय आहे. पण इथे आपण भाषेच्या कार्यामागील व वापरामागील हेतूवरून ललित व वैचारिक लेखन असे जे दोन प्रकार मानता येतात. 'जागतिक नवे पर्व' मध्ये वाङ्‌मयी लेखनात ग्रंथ परीक्षण , चरित्र लेखन आणि कविता असून यातून सामाजिक वास्तवाचे दर्शन घडत असल्याचे दिसते.

**संदर्भ सूची :**

1.कुलकर्णी व.दि., 'मराठी नियतकालिकांचा वाङ्‌मयीन अभ्यास', खंड १, (इ.स.१८३२-१८८२), मुंबई विद्यापीठ आणि मराठी विभाग, श्री विद्याप्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती -१९८७ , पृ.क्र.४

2.जोशी प्र.न., 'मराठी वाङ्‌मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे ,१९७९, पृ.३५

3.गर्दे पु.कृ., 'मराठी विश्वकोश ' खंड ८, (संप.लक्ष्मणशास्त्री जोशी), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ , मुंबई , प्रथमावृत्ती १९७१

4.रोंगटे तुकाराम , 'आदिवासी साहित्य: नियतकालिकातील', डिंपल पब्लिकेशन , वसई रोड, ठाणे , प्रथमावृत्ती २००७

5.पाक्षिक 'जागतिक नवे पर्व' (१९६०-२०१०)